महाराष्ट्र शासन
जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांचे कार्यालय, अहमदनगर.
द्वारा-शासकीय तांत्रिक विद्यालय, स्टेशनरोड, अहमदनगर.
(☎ 0241 - 2959423 E- Mail Address: - Dveto.Ahmadnagar@dvet.gov.in/dveto.ahmednagar16@gmail.com)

जा.क्र.जिव्यशिवप्रअआ/आस्था/अ-१/२०२५/३६५ दिनांक - १४/०३/२०२५

# प रि प त्र क

विषयः- शासकीय व निमशासकीय कार्यालयांसाठी १०० दिवसांचा ७ कलमी कृती आराखडा नियोजन

संदर्भः- १-सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२०२५/प्र.क्र.७/ र.व.का.-१, दिनांक १३ जानेवारी २०२५
२-मा.सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, नाशिक यांचे पत्र जा.क्र.प्राकाना/आस्था/अ-५(अ)/२०२५/७००, दिनांक ३१/०१/२०२५
३-मा.सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, नाशिक यांचे पत्र जा.क्र.प्राकाना/आस्था/अ-५(अ)/२०२५/७८९, दिनांक ०५/०२/२०२५

या कार्यालयाच्या अधिपत्त्याखालील सर्व अशासकीय अनुदानित संस्था/कार्यालय प्रमुखांना तसेच संस्थेतील संबंधीत सर्व वर्ग-क व वर्ग-ड कर्मचा-यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यांत येते की, कोणत्याही संस्था/ कार्यालयामधील सेवानिवृत्त झालेल्या परंतु ज्यांना अद्यापपर्यंत सेवानिवृत्ती वेतनाचे लाभ अथवा इतर सेवाविषयक लाभ मिळण्यास विलंब होत आहे, किंवा त्यांचे प्रकरण या कार्यालयाच्या स्तरावर प्रलंबित आहे, अथवा अशा लाभापासून ते अद्यापही वंचीत आहेत अशा कर्मचा-यांच्या तक्रार निवारणासाठी या कार्यालयाने प्रत्येक महिन्याच्या तिस-या गुरुवारी दुपारी ०३.०० ते ०५.०० या वेळात **"तक्रार निवारण दिन"** म्हणुन साजरा करण्याचे निश्चित केलेले आहे.

या दिवशी सेवानिवृत्ती विषय लाभापासून व सेवानिवृत्ती वेतनापासून तसेच इतर सेवाविषयक लाभापासून वंचित आहेत अशा कर्मचा-यांच्या समस्या जाणुन घेवून त्यावर तातडीने कार्यावाही करण्यांत येणार आहे. त्यामुळे अशासकीय अनुदानित संस्थेच्या सर्व संस्था/कार्यालय प्रमुखांनी या बाबीची नोंद घ्यावी व (१)-हे परिपत्रक संस्था/ कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रदर्शित करावे (२)-शक्य असेल तेथे सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांना देखील संस्थास्तरावरुन ही बाब अवगत करावी तसेच (३)-आपापल्या संस्था/कार्यालयामध्ये कोणत्याही सेवानिवृत्त कर्मचा-यांचे सेवाविषक लाभाचे प्रकरणे/दावे प्रलंबित राहणार नाहीत याची त्यांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.

त्याचप्रमाणे सेवानिवृत्त कर्मचा-यांनी वरील प्रमाणे "तक्रार निवारण दिनास" उपस्थित राहतांना स्वतःकडील आवश्यक ते अभिलेख, यापूवी केलेले अर्ज, पोचपावत्या इ.पुराव्यासह उपस्थित राहावे. केवळ या कार्यालयाच्या स्तरावरील प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्याच्या दृष्टीने या दिवशी कार्यवाही केली जाणार आहे याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

संबंधीत सर्व कार्यालय प्रमुखांनी हे परिपत्रक सर्व कर्मचा-यांच्या निदर्शनास आणुन दयावे.

(सु.द.शिंदे)
जिल्हा व्यवसाय शिक्षण व
प्रशिक्षण अधिकारी, अहिल्यानगर

प्रति,
१-प्राचार्य/मुख्याध्यापक, जिल्हयातील संबंधीत सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित संस्था, यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी
प्रत- १.मा.सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, नाशिक यांना माहितीस्तव सविनय सादर
२-या कार्यालयाच्या सूचनाफलकावर प्रदर्शित करण्यासाठी.
३-या कार्यालयाचे अ-२ विभागास माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.